# अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त NBFC MFI

ANIK



## चौदावा वार्षिक अहवाल

# 2022-2023

www.anikfin.com | anikfin@gmail.com | (02382)227782

# आमची वैशिष्टये

**१०७३१**
एकूण Active ग्राहक

**३१.९० कोटी**
एकूण कर्ज पोर्टफोलिओ

**२**
राज्यात कार्यरत

**८**
एकूण शाखांची संख्या

**७७**
एकूण कर्मचारी संख्या

- नाविन्यपूर्ण त्रिस्तरीय संरचना
- महिलांच्या सहभागातून महिलांचे आर्थिक सक्षक्तीकरण
- गेली १३ वर्षे ९९% कर्ज वसुलीचे ट्रॅक रेकॉर्ड
- १००% पतपुरवठा केवळ महिलांसाठी
- समाजातील दुर्लक्षित घटकांकरीता कार्य
- १००% कर्ज पाठपुरावा महिलांव्दारे

माहिती संकलन – संपुर्ण अनिक टिम

अंकमांडणी व डिझाईन - उमेश टोणपे
मुद्रण - Codenetz

# अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड

## चौदावा वार्षिक अहवाल २०२२-२०२३

## विद्यमान संचालक मंडळ



श्री रमेश भिसे
चेअरमन



श्री जयाजी पाईकराव
व्हाईस चेअरमन



श्री. विश्वनाथअण्णा तोडकर
व्यवस्थापकिय संचालक



श्री. हेमंतकुमार वाळवेकर
संचालक



श्री. विक्रमजित मेहमी
संचालक



श्रीमती सीमंतिनी खोत
संचालक



श्री. सुभाष तगारे
संचालक



श्री.ऋषीकेश विश्वनाथ तोडकर
संचालक



श्री. विजय रमेश भिसे
संचालक



श्री सुरज बालासाहेब सूर्यवंशी
संचालक

# व्यवस्थापकीय समिती



**श्री रमेश भिसे**
अध्यक्ष



**श्री. विश्वनाथअण्णा तोडकर**
व्यवस्थापकिय संचालक



**श्री.बालासाहेब सूर्यवंशी**
उपाध्यक्ष



**श्री. यशवंत आहेर**
मुख्यकार्यकारी अधिकारी



**श्री. विलास गोडगे**
ऑपरेशन हेड (उस्मानाबाद युनिट)

## अनिक वरिष्ठ प्रबंधन अधिकारी (मुख्यकार्यालय)

**सौ.तेजश्री भालेराव** (अकाउंट एक्झिक्यूटिव्ह)
**श्री. उमेश टोणपे** (सॉफ्टवेअर प्रभारी)

## अनिक वरिष्ठ प्रबंधन अधिकारी (शाखाव्यवस्थापन)

**श्री. शरद पवार**, (शाखाधिकारी, केज बीड)
**श्री. भिकाजी जाधव**, (शाखाधिकारी कळंब उस्मानाबाद)
**श्री. बालाजी शेंडगे**, (शाखाधिकारी, वाशी उस्मानाबाद)
**श्री. अतुल चिलवंत**, (शाखाधिकारी, भुम उस्मानाबाद)
**श्री.सुरज बालासाहेब सुर्यवंशी** (शाखाधिकारी, लातूर )
**श्री. सुशांत पाईकराव**, (शाखाधिकारी, हिंगोली)
**श्री. श्रीरंग वाळवेकर**, शाखाधिकारी, विकाराबाद, (तेलंगणा)

## लेखापरीक्षक

**Yadkikar & Chandak**
Chartered Accountant
(ICAI Firm Registration No 129599 W
Aurangabad)

## बॅंकर्स

National Scheduled Caste Finance & Development Corporation **(NSFDC)** Delhi

RBL BANK

State Bank of India
THE BANKER TO EVERY INDIAN



# मनोगत

**श्री रमेश भिसे,** (चेअरमन)

अनिक फायनान्शिअल सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेडचा चौदावा वार्षिक प्रगती अहवाल आपणास सुपूर्त करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. महाराष्ट्र आणि तेलंगणा या दोन राज्यातील पाच जिल्ह्यात एकूण आठ शाखेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गोरगरीब अविकसित घटकातील समाजाचा आर्थिक सामाजिक विकास करण्याच्या उद्देशाने वीस हजार कुटुंबांना त्यांचे छोटे व्यवसाय उभे करण्यासाठी तसेच त्यांची शेती व शेती वर आधारित उद्योग उभारणीसाठी अनिकच्या माध्यमातून सूक्ष्म कर्ज पतपुरवठा केलेला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या गरजा पूर्ण होऊन त्यांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी त्यांना मदत झालेली आहे. कर्ज उद्योगावरती आधारित त्यांचे क्षमता बांधणी, प्रशिक्षण ही गावागावातील कर्जदार लोकांना दिल्याने तसेच विविध सोशल उपक्रम त्यांचे सोबत राबवल्याने गरिबांच्या जीवनात एक नवीन ऊर्जा निर्माण झालेली आहे.

सर्व कर्जदारकांनी घेतलेले कर्ज हे त्याच उद्योग व्यवसायासाठी वापरून ९९ टक्के नियमित परतफेड केलेली आहे. तसेच सर्व गुंतवणूकदारांना १२ टक्के दराने ठेवी वरती डिव्हिडंट चा परतावा दर तिमाही चार्ज १००टक्के वेळेत परतफेड होत असून इतक्या मोठ्या प्रमाणात डिव्हीडंट देणारी अनिक ही पहिली कंपनी आहे. अनिकच्या कामाच्या प्रगतीमध्ये अनिक च्या सर्व स्टाफ, संचालक मंडळ, हितचिंतक यांचा खूप मोठा मोलाचा सहभाग आहे. भविष्यातही असेच आपल्या सर्वांच्या सहकार्याच्या अपेक्षेत.

**आपला सहकारी**

**रमेश भिसे**
चेअरमन
**अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड**



# मनोगत

## श्री. विश्वनाथअण्णा तोडकर (व्यवस्थापकिय संचालक)

अनिक फायनान्शिअल सव्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न होत आहे. वार्षिक सभेच्या निमित्ताने अनिक फायनान्शिअल सव्हिसेस प्रायव्हेटचा चौदावा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करताना आम्हाला मनस्वी आनंद होतो आहे. या वार्षिक अंकाच्या मार्फत कंपनीची प्रगती आणि कंपनीच्या एकूण यशाची वाटचाल आपणासमोर व्यक्त करण्यास अत्यंत समाधान होत आहे. समाजातील तळागाळातील उपेक्षित, दलित, अल्पभूधारक, कष्टकरी, कामकरी, शेतमजूर कुटुंबाचा आर्थिक विकास झाला पाहिजे, या सर्व घटकांकरीता उद्योग व्यवसाय निर्माण होऊन रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या पाहिजेत. रोजगाराच्या संधी निर्माण करत असताना त्या कुटुंबातील प्रत्येक महिलेला उद्योग, व्यवसाय, रोजगार यामध्ये प्रथम स्थान मिळाले पाहिजे. आणि कुटुंबातील एकूण कारभारामध्ये विशेषता आर्थिक कारभारामध्ये महिलांना प्राधान्य मिळाले पाहिजे या भूमिकेतून अनिक फायनान्शिअल सव्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड आर्थिक विकासाचे कार्य करत आहे. म्हणूनच अनिकने महिलांना प्राधान्य देऊन महिलांच्या मार्फतच संपूर्ण कार्यकारभार आणि आर्थिक देवाणघेवाणीमध्ये महिलांना प्राधान्य दिलेले आहे.

### महिलांना आर्थीक सहाय्य उपलब्ध केल्यामुळे

- **महिलांची आर्थिक साक्षरता विकसित झाली**
- **रोजगाराचा आणि उद्योग व्यवसायाचा महिलांचा दृष्टिकोन विकसित झाला**
- **आर्थिक व्यावसायिक हिशोब ठेवण्यामध्ये महिला पारंगत झाल्या**
- **कुटुंबाच्या आर्थिक विकासामध्ये महिलांच्या सहभागामुळे कुटुंबातील त्यांचे स्थान उंचावले**
- **महिलांच्या या योगदानामुळे मुलांचं शिक्षण चांगल्या प्रकारे करता आलं**
- **कुटुंबाच्या आर्थिक प्रगती बरोबरच कुटुंबातील स्थावर मालमत्ता जमीन घर अशा पद्धतीची संसाधने विकसित झाली.**

### ठळक नोंदी

- **मार्च २०२२ अखेर कंपनीचे आऊटस्टँडिंग होते रू २२ कोटी ९७ लाख**
- **मार्च २०२३ अखेर झालेले आहे ३१ कोटी ९० लाख**
- **गुतवणूंकीमध्ये मोठी वाढ होत आहे.**
- **कंपनीवर गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला आहे**
- **रिकव्हरीचे प्रमाणे ९९.५८ टक्के आहे**
- **एन पी ऐ मध्ये घटझालेली आहे.**
- **वेगवेगळया सामाजीक उपक्रमातुन देखील कंपनीने आपला वेगळा ठसा जनमानसात उमठवला आहे.**

**अशा प्रकारचे विविध फायदे अनिक बरोबर जोडल्या गेलेल्या प्रत्येक कुटुंबाला झालेले आहेत आणि अनिक फायनान्शिअल सव्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड मुळे उपेक्षित दलित आणि गरीब कुटुंबांचा आर्थिक विकास होतो आहे याचे मनस्वी समाधान आहे. दरवर्षी अनिक फायनान्शिअल सव्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचा आपल्या कामाचा आणि एकूण प्रगतीचा आलेख अधिक प्रगल्भ आणि विकसित होतो आहे.**

### त्यातील महत्त्वाचे काही ठळक मुद्दे खालील प्रमाणे आहे

✻ अत्यंत महत्वाचे म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्व प्रणालीप्रमाणे कंपनीचे कामकाज चालू आहे. भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्रत्येक नियमांचा आणि मार्गदर्शक तत्त्वांचा कंपनी आपल्या कामांमध्ये काटेकोरपणे अवलंब करते. कंपनी कायद्यानुसार रजिस्टर ऑफ कंपनीजच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वाला अवलंबून कंपनी आपला कार्यकारभार करत आहे. तसेच इन्कम टॅक्स डिपार्टमेंटच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचेही कंपनी तंतोतंत पालन करते आहे. एकूणच शासनाच्या कंपनीशी संबंधित सर्व विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या व नियमांच्या तसेच अटींच्या आधीन राहून कंपनी आपलं कामकाज करत आहे.

**✻ भविष्यात अधिकाधिक लोकहिताची आणि समाजाच्या उपयोगाचं काम कंपनीच्या हातून करण्याच्या साठी गरिबांच्या आर्थिक विकासासाठी आम्ही कटिबद्ध राहू अशी या वार्षिक अहवालाच्या निमित्ताने आपणास आम्ही खात्री देत आहोत.आणि या वार्षिक चौदाव्या सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने प्रसिद्ध केलेल्या वार्षिक अंकातून आपणास हार्दिक हार्दिक शुभेच्छा देत आहोत..**

**श्री. विश्वनाथअण्णा तोडकर** (व्यवस्थापकीय संचालक)



# मनोगत

**श्री बालासाहेब सूर्यवंशी** (उपाध्यक्ष, अनिक व्यवस्थापकीय समिती)

सप्रेम नमस्कार , अनिक फायनान्सियल सव्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, लातूर यांचा चौदावा वार्षिक अहवाल प्रकाशित होत आहे, निश्चितच आपणा सर्वांना व मला पण मनस्वी आनंद होत आहे. आपण सध्या वेगाने प्रगती करणा-या जागतिक वातावरणात जीवन जगत आहोत. आपला भारत देश महासत्ता बनण्याच्या स्वप्नाबरोबरच आता आत्मनिर्भर बनण्याचे स्वप्न पाहत आहे व त्या दृष्टिकोनातून आपल्या देशाचे नेतृत्व प्रयत्न करीत आहे. या स्पर्धेमध्ये ग्रामीण भाग मात्र फरपटत मागे येत आहे असे वाटते, औद्योगिक विकासाचे केंद्र शहरात स्थायिक झाले. ग्रामीण भागात कच्च्या मालावर आधारित व स्थानिक कौशल्य आधारित लघुउद्योग मोठ्या प्रमाणात सुरू होणे अपेक्षित होते, परंतु तसे अद्याप झालेले दिसत नाही.

विशेषतः मराठवाड्यामध्ये सततचा दुष्काळ, सिंचनाच्या अपु-या सोयी, रोजगारासाठी होणारे स्थलांतर, इत्यादी समस्येमुळे ग्रामीण भागातले आर्थिक दारीद्र्य कमी होताना दिसत नाही. आर्थिक उन्नती साधण्यासाठी पायाभूत साधनाचा असलेला अभाव, तसेच राज्य शासनाकडून मराठवाड्यातला मागासलेपणाचा गॅप अद्याप भरून निघालेला नाही. ग्रामीण भागातील दरडोई उत्पन्न वाढत नाही. मग आत्मनिर्भर बनण्याचे स्वप्न कसे साकार होणार? हा प्रश्न आपल्या सर्वांच्या समोर निर्माण झालेला आहे. हा चिंतनाचा विषय आहे, परंतु यासाठी जे प्रयत्न होत आहेत, ते कासवगतीने दिसत आहेत. समाजातल्या प्रतिनिधींनी तसेच नागरीकांनी फक्त शासनावर अवलंबून न राहता, जनतेच्या सहकार्याने काही आर्थिक विकासाच्या प्रक्रिया चालू करणे व ते टिकवणे गरजेचे आहे . अनिक फायनान्सियल सव्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, लातूर ही ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती बदलण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. ग्रामीण विकास प्रक्रियेचा अगदी पायाभूत अनुभव असणा-या नेतृत्वाच्या पुढाकारातून अनिक फायनान्सियल सर्विसेस या आर्थिक कंपनीचा कारभार प्रगती करत आहे. यामुळे ख-या अर्थाने ग्रामीण भागातील महिलांना अल्पशा प्रमाणात, पण सातत्याने विकासाची प्रक्रिया मजबूत होण्यास मदत होत आहे व भविष्यातही होणार आहे.

येणा-या कालावधीमध्ये अनिक फायनान्सियल सर्विसेस अगदी यशस्वी ठरणार आहे, यावर माझा पूर्ण विश्वास आहे. विशेषता यामध्ये सामान्य महिला भागीदार बनत आहेत, त्या फक्त व्यवसायासाठी कर्ज घेत आहेत, असेच नव्हे, तर गुंतवणुकीची प्रक्रिया ही मोठ्या प्रमाणात करत आहेत. यातून हजारो महिला घरगुती व लघुव्यवसाय करीत आहेत आणि यामुळे कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात मोठी भर पडत, असून त्याबरोबरच कुटुंबातील बालकांच्या शैक्षणिक प्रगतीमध्येही मोठा हातभार लावत आहेत. या आर्थिक विकास प्रक्रियेचा मजबूत पाया ग्रामीण भागातील महिला शक्ती, व्यवहारातील पारदर्शकता, कुशल कर्मचारी वर्ग, अनुभवी व्यवस्थापन तसेच जिद्दी व मेहनती उद्योजक महिला वर्ग आहेत. यामुळे निश्चितच ग्रामीण विकासाचे आर्थिक मॉडेल निर्माण करण्याची शक्ती या प्रक्रियेमध्ये आहे, यावर माझा विश्वास आहे. हेच स्तुत्य कार्य करण्यासाठी माझ्यासारख्या एका कार्यकर्त्याचा खारीचा वाटा यामध्ये आहे. याचा मला आनंद होतो आहे. नक्कीच यापुढेही आणखी ताकदीने या महिला शक्तीच्या जोरावर ही विकास प्रक्रिया अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करूयात. या प्रक्रियेमध्ये सहभागी झालेल्या व होत असलेल्या सर्व टीमचे मनापासून अभिनंदन.

**आपला सहकारी**
**बालासाहेब सूर्यवंशी.**
उपाध्यक्ष, अनिक व्यवस्थापकीय समिती.



# मनोगत

**श्री. सुभाष तगारे** (संचालक)

नमस्कार अनिक कंपनीचा हा चौदावा वार्षिक अहवाल... या चौदा वर्षात कंपनीची घोडदौड जोरातच झाली.या महत्त्वाच्या टप्प्यावर विचार केला!!! या चौदा वर्षात अनिक कंपनीने काय साध्य केलं? फक्त नफा मिळविणे हा अनिकचा मूळ उद्देश कधीच नव्हता. खेडेगावातल्या ग्रामीण भागातल्या महिलांना अर्थपुरवठा करून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी छोटे,छोटे उद्योग महिलांनी करावेत आणि आपली, आपल्या कुटुंबाची, आर्थिक परिस्थिती सुधारावी हा आपल्या अनिक कंपनीचा अत्यंत महत्त्वाचा उद्देश आहे. याप्रमाणे असे लक्षात येते की आपण सुरुवातीला ज्या महिलांना कर्ज दिले त्या महिलांनी आपला उद्योग केला. पहिल्या कर्जाची परतफेड केली, दुसरे कर्ज घेतले परिस्थिती सुधारली, मुलांचे शिक्षण केले, स्वतःचा उद्योग वाढवला घर बांधले.

सुमारे चार ते पाच वेळा कर्ज घेतलेल्या महिला आता आपल्या अनिकच्या गुंतवणूकदार बनलेल्या आहेत हे आपलं फार मोठं साध्य आहे असं मला वाटतं. गुंतवणूकदारांच्या गुंतवणुकीतून स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही गोष्टी साध्य होतात. गुंतवणूकदारांना डिव्हिडंड मिळतो हा झाला स्वार्थ आणि आपल्या पैशाचा विनियोग ग्रामीण महिलांच्या आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी होतो हा झाला परमार्थ.

आपले स्थानीक गुंतवणूकदार वाढत आहेत ही एक महत्त्वाची जमेची बाजू आहे. ज्या गावात आपण कर्ज दिले आहे त्या गावातील चांगली परिस्थिती असलेले लोक आपल्याकडे गुंतवणूक करीत आहेत. म्हणजेच गावातीलच पैसा गावातीलच महिलांसाठी वापरला जाईल आणि या पैशातून त्या गावातील गुंतवणूकदारांचा पण फायदा होईल असा दुहेरी कार्यक्रम आपल्या अनिक कंपनीमध्ये आहे, हे आपल्या कंपनीचे वैशिष्ट्य आहे.

**देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे या उक्तीप्रमाणे कर्जदार महिला आता गुंतवणूकदार झालेल्या आहेत. धन्यवाद!!!**

**श्री. सुभाष तगारे**
**(संचालक)**
**अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड**

ANIK

# चौदावी वार्षिक सर्वसाधारण सभा सन - २०२२- २०२३

स्थळ – रजिस्टर्ड ऑफिस, लातुर

दिनांक २९ सप्टेंबर २०२३

## संचालक मंडळाचा अहवाल सन २०२२-२०२३

**सन्माननीय संचालक व सदस्य,**

**दिनांक ३१ मार्च २०२३** रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा लेखा परिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा व तोटा पत्रक संचालक मंडळाच्या तेराव्या वार्षिक अहवालासोबत आपल्यासमोर सादर करतांना आनंद होत आहे.

प्रगती चित्र (आकडेवारी कोटींमध्ये)

| तपशील | वर्ष अखेर ३१ मार्च २०२२ | वर्ष अखेर ३१ मार्च २०२३ |
|---|---|---|
| कर्जे (निव्वळ) | २२.९६ | ३१.९० |
| ढोबळ नफा | ०.१६ | ०.१८ |
| निव्वळ नफा | ०.११ | ०.१३ |




मागील ५ वर्षांतील निव्वळ कर्ज स्थिती (आकडेवारी कोटींमध्ये)




मागील ५ वर्षांतील निव्वळ नफा चित्र (रक्कम लाखांमध्ये)

## नफा विनियोग

चालू वर्षाच्या नफ्याचा विनियोग खालीलप्रमाणे आहे.

(आकडेवारी लाखात)

| विनियोग | रक्कम रु |
|---|---|
| वैधानिक निधी | २.५४ |
| शिल्लक नफा | १०.१८ |
| एकुण | १२.७२ |

हया वर्षी कंपनीला निव्वळ नफा १२ लाख ७२ हजार झाला आहे, कंपनीच्या भांडवल वाढीचा उददेश समोर ठेवून संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०२२-२०२३ वर्षाकरीता Equity वर लाभांश न देण्याचा निर्णय घेतला आहे.

## भांडवल पर्याप्तता प्रमाण

कंपनीचे स्वतःचे भांडवल वाढलेले असले तरी NSFDC चे रू ४६३.११ लाख व इतर कर्ज आणि अँडव्हान्सेस (NCD) रू १७६४.३९ लाख असल्या कारणाने भांडवल पर्याप्तता मध्ये थोडीशी वाढ झाल्यामुळे **भांडवल पर्याप्तता प्रमाण गतवर्षीच्या २८.५५% पेक्षा या आर्थिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये २०.७६% झालेले आहे.**

# कंपनीचे भांडवल व स्वनिधी

**दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी कंपनीच्या एकूण भांडवल व स्वनिधी स्थिती खालीलप्रमाणे**

| तपशील | रक्कम लाखात |
|---|---|
| चुकते केलेले भांडवल | ९७९.६६ |
| राखीव व शिल्लक भांडवल | २३४.९३ |
| शेअर ॲप्लिकेशन मनी | ०.० |
| एकूण भांडवल | १२१४.५९ |
| उणे स्टेच्युटरी रिझर्व्ह | १६.५९ |
| स्वनिधी | ११९८.०० |

**गेल्या आर्थिक वर्षात कंपनीचे स्वतःचे भाग भांडवल रू १०.१८ लाखाने वाढले आहे.**

# कर्जे

**गत आर्थिक वर्षात २०२२-२०२३** मध्ये कंपनीने एकूण **६४१५ गटांना** रु **२९.५० कोटींचे कर्ज वाटप केले**. रिझर्व्ह बँकेच्या नवीन मार्गदर्शक सुचनेची पुर्तता कंपनीने तंतोतंत आंमलात आणली आहे, **रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे लक्षात ठेवुनच गटांना कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.**

**युनिट निहाय (३१ मार्च २०२३) रोजी कर्ज स्थिती खालील प्रमाणे आहे.**

| Unit Name | Loan Outstanding | No of Ac | OD Amount | Recovery % |
|---|---|---|---|---|
| BHOOM | 68544937 | 2678 | 488050 | 98.80% |
| HINGOLI | 5164344 | 197 | 0 | 98.50% |
| KAIJ | 99062754 | 2605 | 757607 | 98.70% |
| KALLAM | 81828340 | 3175 | 1044707 | 98.60% |
| LATUR | 9832668 | 232 | 95791 | 96.50% |
| VIKARABAD | 6769653 | 159 | 0 | 100.00% |
| WASHI | 47772110 | 1685 | 306048 | 98.55% |
| Total | 318974806 | 10731 | 2692203 | 99.71% |

**एन पी ए व्यवस्थापन**

दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी कंपनीचे वसुलीचे प्रमाण ९९.७१ टक्के आहे कंपनीची अनुत्पादक कर्ज रू ९.१४ लाख आहेत व यापुढे अनुत्पादक कर्ज वाढणार नाही याची काळजी सर्व युनिट मॅनेजरनें घेणे गरजेचे आहे.

# कर्मचारी वर्ग

मायक्रो फायनान्ससारख्या सेवा क्षेत्रात बचत गट व संयुक्त जबाबदारी गटापर्यंत पोहचण्याकरीता व गरजुना सेवा देण्याकरीता कर्मचा-यांचे मोठे योगदान आहे याबददल कंपनीस आपल्या कर्मचा-यांवर विश्वास आहे , सर्व युनिट वर आवश्यक त्या गरजेनुसार धोरणात्मक व प्रशासनात्मक या दोन्ही स्तरावर नेतृत्व विकसित करण्याच्या दृष्टीने कंपनीने योग्य असे धोरण तयार केलेले आहे. **कर्मचा-यांना कौशल्य, ज्ञान व क्षमता विकसित करण्याकरता कंपनीने कर्मचा-यांना वेळोवेळी प्रशिक्षण दिलेले आहे. विविध स्तरावरील कुशल कर्मचारी भरती करणेबाबतीतही कंपनीने पावले उचलली आहेत.**

## सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाअखेर कर्मचारी स्थिती

| युनिट | CEO | Operation Head | A/c Exe | BM | Software Incharge | Risk Manager | FX | CA | Accountant | Office Assistant | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुख्य कार्यालय | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 4 |
| लातुर | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 1 | 2 | 1 | 0 | 6 |
| बीड | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 2 | 9 | 2 | 1 | 17 |
| हिंगोली | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 2 | 1 | 0 | 5 |
| उस्मानाबाद जिल्हा कार्यालय | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 3 |
| कळंब (उस्मानाबाद) | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 10 | 1 | 1 | 15 |
| भुम (उस्मानाबाद) | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 9 | 1 | 0 | 13 |
| वाशी (उस्मानाबाद) | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 8 | 1 | 0 | 12 |
| विकाराबाद | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 3 |
| एकुण | 1 | 1 | 2 | 7 | 1 | 3 | 10 | 42 | 7 | 3 | 77 |

## शाखा विस्तार

**आर्थिक वर्ष २०२१ २०२२** मध्ये **तेलंगणा राज्यात** नवीन युनिट उघडलेले आहे, यासोबतच कंपनीने **मल्टीस्टेटचा** दर्जा प्राप्त कलेला आहे.




## माहिती तंत्रज्ञान

- हया आर्थीक वर्षात कंपनीने जयम सोल्युशन्स हया हैद्राबादस्थित कंपनीकडुन eFimo हे नवीन संगणकीकृत ऑनलाईन व्यवहाराचे सॉपटवेअर विकसित केले असुन आजघडीला कंपनीचे सर्व युनिट हे ऑनलाईन व अपडेट आहेत.

- तसेच हया नवीन संगणक प्रणालीमध्ये सर्व डेटादेखील यशस्वीपणे ट्रान्सफर करण्यात आलेला आहे.

## जोखीम व्यवस्थापन

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमान्वये कंपनीने जोखीम व्यवस्थापनाकरीता समिती स्थापन केली आहे. कंपनीच्या जोखीम व्यवस्थापन समितीमध्ये संचालक मंडळ हे शिर्षस्थानावर आहे ते संपूर्ण जोखमींची देखरेख करते.

## अंतर्गत नियंत्रण पध्दत

कंपनीचा दरआठवडयाला घेतला जाणारा विकली रिपोर्ट तसेच फिल्ड वरील कर्मचा-यांचे रोजच्या रोज घेतले जाणारे रेकॉर्ड व मासिक रिपोर्ट या सर्वांकरीता कंपीनने विविध प्रकारचे फॉरमॅट बनविले असून या फॉरमॅट च्या सहाय्याने कंपनीने अंतर्गत नियंत्रण पदधतीत सुसूत्रता आणली आहे.कंपनीचे सर्व युनिटचे सहामाही अंतर्गत लेखा परिक्षण नियमित करण्यात आलेले आहे. तसेच कंपनीच्या सर्व शाखांचे वार्षिक परिक्षण हे चार्टड अकाउंट्स फर्मकडून करुन घेतले जाते .

**महत्वपुर्णः संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या धोरणांप्रमाणे सर्व शाखांची अंतर्गत तपासणी व ऑडीट हे सन २०२२- २०२३ मध्ये करण्यात आलेले आहे**

## कंपनीचे ध्येय

खेडयातील गरीब महिलांना योग्य दरात आर्थिक सहाय्य देण्याबरोबरच त्यांचे राहणीमान उंचावणे व त्यांना परवडणा-या दरात आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे व सोबतच त्यांचे सक्षमीकरण करणे.

**Aims to empower rural poor women and to improve their standard of living by extending integrated financial services at affordable costs.**

## कंपनीचे व्हिजन

- **सन २०२७ पर्यंत महाराष्ट्रातील ४०००० कुटूंबांना १० शाखांच्या माध्यमातून ५० कोटीपर्यंतचे अर्थसहाय्य करणे त्याचबरोबर महाराष्ट्राबाहेर देखील कंपनीचा विस्तार करून कंपनीची प्रतिमा जनमानसात बिंबवणे.**

  **To promote sustainable livelihoods of 40000 families by opening and serving through 10 units by 2027.**

- **सामाजातील दुर्लक्षित घटकांना सुक्ष्म वित्त देणारी व्यावसायीक दृष्टया व्यवस्थापन असलेली सुक्ष्म वित्त संस्था**

  **To extend the micro-financial services including to the so-far excluded community by establishing a professionally managed Community-based micro-finance institution.**

- **ग्रामीण भागातील महिलांचे मानवी हक्क व जमीन हक्काबरोबर त्यांचे सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे.**

  **Enhance socio-economic status of rural women while continuing its movement for human and land rights.**

## आर्थिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये घेण्यात आलेल्या बोर्ड मिटींग व त्याकरीता असलेली संचालकांची उपस्थिती

| क्र. | संचालकांचे नांव | संचालक मंडळाच्या बैठका | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 9/04/22 | 08/07/22 | 09/12/22 | 23/01/23 | एकुण |
| 1 | रमेश विनायक भिसे | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | 4 |
| 2 | विश्वनाथ शिवमुर्ती तोडकर | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | 4 |
| 3 | सुभाष कृष्णाजी तगारे | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | 2 |
| 4 | जयाजी पुरभाजी पाईकराव | उपस्थिती | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | उपस्थिती | 1 |
| 5 | सीमांतिनी शशांक खोत | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | उपस्थिती | अनुउपस्थिती | 1 |
| 6 | हेमंतकुमार वाळवेकर | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | 4 |
| 7 | विक्रमजित मेहमी | अनुउपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | अनुउपस्थिती | 2 |
| 8 | ऋषीकेश विश्वनाथ तोडकर | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | 4 |
| 9 | विजय रमेश भिसे | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | 4 |
| 10 | सुरज बाळासाहेब सुर्यवंशी | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | 4 |

## संचालकांच्या समित्या

**कंपनीच्या हिताच्या दृष्टीने संचालक मंडळाने संचालकांच्या ५ समित्या स्थापन केल्या आहेत सदर समित्या त्यांचे अधिकारात येणा-या कार्यक्षेत्रांविषयी धोरण ठरवितात. संचालक मंडळाच्या समित्या व त्यांचे सदस्य खालीलप्रमाणे**

| क्र. | समितीचे नांव | सदस्य |
|---|---|---|
| १ | **रिस्क मॅनेजमेंट समिती** | श्री सुभाष तगारे (संचालक)<br>श्री.बालासाहेब सुर्यवंशी (उपाध्यक्ष मॅनेजमेंट कमिटी)<br>श्री.ऋषीकेश विश्वनाथ तोडकर,(संचालक)<br>श्री विलास गोडगे (ऑपरेशन हेड उस्मानाबाद जिल्हा)<br>श्री. शरद पवार (युनिट मॅनेजर - बीड) |
| २ | **मानव संसाधन समिती** | श्री.रमेश भिसे (चेअरमन)<br>श्री. बालासाहेब सुर्यवंशी (उपाध्यक्ष मॅनेजमेंट कमिटी)<br>श्री. यशवंत आहेर (सी ई ओ)<br>श्री. शरद पवार (युनिट मॅनेजर - बीड) |
| ३ | **परिचालन समिती** | श्री.विश्वनाथ तोडकर (व्यवस्थापकिय संचालक)<br>श्री.यशवंत आहेर (सी.ई.ओ)<br>श्री.विलास गोडगे (ऑपरेशन हेड उस्मानाबाद जिल्हा)<br>श्री.सुशांत पाईकराव, हिंगोली |
| ४ | **सामजिक वित्तीय व विमा** | श्री. जयाजीराव पाईकराव (संचालक)<br>श्री. सुरज बालासाहेब सुर्यवंशी (संचालक)<br>श्री. विजय भिसे (संचालक)<br>श्री. विलास गोडगे (ऑपरेशन हेड उस्मानाबाद जिल्हा) |
| ५ | **ऑडीट प्रणाली** | श्री विश्वनाथ तोडकर (व्यवस्थापकिय संचालक)<br>श्री .यशवंत आहेर (सी ई ओ)<br>श्री. शरद पवार (युनिट मॅनेजर)<br>श्री. सुशांत पाईकराव, (युनिटमॅनेजर हिंगोली)<br>श्रीमती.तेजश्री भालेराव (अकाउंट एक्झिक्यूटिव्ह,HO) |

**प्रकटन** कंपनीने कंपनीच्या हितसंदर्भाने संस्थापक, संचालक व नातेवाईक आणि व्यवस्थापन यांच्यामध्ये गंभीर हितसंबंध होण्याची संभावना निर्माण होईल असे व्यवहार कंपनीत केलेले नाहीत. कंपनीत होणारे प्रत्येक व्यवहार हे कंपनीने ठरविलेल्या ध्येय धोरणांनुसारच व पारदर्शकपदधतीने होतात यांची संचालक मंडळ हमी देत आहे.

## संचालक मंडळाचे जबाबदारीचे विधान

**दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या वार्षिक हिशोबात खालील प्रमाणे पुर्तता झाल्याचे संचालक मंडळ पुष्टी देते**

- वार्षिक हिशोब पुर्ण करीत असतांना पुरक स्पष्टीकरणांसोबतच सर्व अकाउंटिंग स्टँडर्डचे पालन करण्यात आले आहे

- कंपनीने रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनांन्वये अकावूंटींग पॉलिसीज तयार केल्या असुन त्याच्या अंमलबजावणीमध्ये सातत्य ठेवले आहे.

- दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाची हिशोब पुस्तके व नफा यात सत्यता व पुरकता येण्याकरता योग्य गृहीतके व अंदाज बांधण्यात आले आहेत.

- कंपनीच्या मालमत्तेच्या सुरक्षेकरीता तसेच गैरव्यवहांरास व इतर नियमबाहय गोष्टी रोखणेकरिता भारतात रुढ असलेल्या तरतुदीन्वये अकाउंटिंग रेकॉर्डसच्या पालनांकरिता योग्य ती खबरदारी घेतली आहे

## कंपनीची तत्व प्रणाली

**कार्यक्षमपणे व्यवहार करणे , भागधारकांचे हित जोपासणे , पारदर्शी व योग्य व्यवस्थापन करण्यास कंपनी वचनबदध आहे सर्व कामकाज पारदर्शीपणे व जबाबदारीने पार पाडीत असलेबाबत संचालक मंडळ खात्री देत आहे.**

## लेखा परिक्षकांचा आर्थिक वर्ष २०२२- २०२३ चा अहवाल

**लेखा परिक्षकांच्या अहवालामध्ये प्रतिकुल ताशेरे व नोंदी नाहीत**

## आर्थिक वर्ष २०२३- २०२४ करिता लेखा परिक्षकांची नेमणूक

**कंपनीचे लेखा परिक्षक 'याडकीकर आणि चांडक' चार्टड अकावुंटंट , औरंगाबाद. हे कंपनीचे मुख्य लेखा परिक्षक असुन त्यांनी अतिशय उत्कृष्ट पध्दतीने सन २०२२-२०२३ चे लेखापरिक्षण त्यांनी अतिशय उत्कृष्ट पध्दतीने केले आहे त्यामुळे ते फेर नेमणुकीस पात्र आहेत सबब त्यांची सन २०२३ - २०२४ या आर्थिक वर्षाकरीता लेखा परिक्षक म्हणुन नेमणुक करून त्यांचा मेहनताना ठरविण्यात यावा ही विनंती करण्यात येत आहे-**

## आर्थिक वर्ष २०२२- २०२३ मधील महत्वाच्या बाबी

- **गेल्या आर्थिक वर्षात राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त एवंम विकास निगम (NSFDC) यांनी कंपनीची जास्तीत जास्त कर्ज घेण्याची मर्यादा रू २ कोटींवरून रू ५ कोटी केली आहे. या वाढीव कर्जमर्यादेमुळे कंपनीने टाकलेल्या प्रस्तावास मान्यता देवुन NSFDC यांनी कंपनीला या आर्थिक वर्षात रू ७९.६३ लाखांचे कर्ज उपलब्ध करून दिले आहे.**

- **गेल्या आर्थिक वर्षात कंपनीच्या स्वतःच्या भाग भांडवलामध्ये रु १०.१८ लाखाची वाढ झालेली आहे व मार्च २०२३ पर्यंत कंपनीचे स्वतःचे भाग भांडवल रु १२ कोटी १५ लाखापर्यंत झालेले आहे यामधे कंपनीचे भागधारक , भागीदार इतर सभासद यांचा महत्वाचा सहयोग आहे.**

## आर्थिक वर्षे २०२२- २०२३ मधील महत्वाच्या बाबी

- कंपनीचे भागभांडवल वाढल्यामुळे व राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त एवंम विकास निगम (NSFDC) यांनी दिलेल्या कर्जामुळे कंपनीने गेल्या आर्थिक वर्षांत एकूण कर्जवाटप ६४१३ गटांना रू २९.५० कोटी केलेले आहे ही उल्लेखनिय बाब आहे.
- कंपनीचे एकुण कर्जस्थिती (Outstanding) २२.९६ कोटींवरून ३१.९० कोटींपर्यंत झालेली आहे.
- SMERA या रेटींग एजन्सीने आपल्या कंपनीचे नुकतेच ग्रेडींग केले आहे व त्यांनी आपल्या कंपनीला M 4 हे ग्रेडींग दिलेले आहे.
- कंपनीने गेल्या आर्थिक वर्षात NCD (Non-Convertible Debenture) मध्ये एकूण ९.५९ कोटी उभे केले आहे.
- सर्वात महत्वाचे म्हणजे कार्यक्षमता वाढीच्या दृष्टीकोनातून कंपनीने जयम सोल्युशन्स हया कंपनीकडुन नवीन संगणकीय प्रणाली ई फिमो खरेदी केले आहे. तसेच कंपनीची कर्ज रिकव्हरी प्रमाण देखील ९९.७१% आहे. .

## आभार

कंपनीने अलिकडील काळात व्यावसायिकता व तंत्रज्ञान अंगीकारले असून कंपनीचा व्यवसाय व नफा व क्षमता वाढीस याचा उपयोग होत असून या व्यवसाय वाढीस कंपनीच्या कर्मचारी वर्गाचाही महत्वाचा सहभाग आहे यामुळे कंपनीने सर्व बचत गटांमध्ये व जनमानसात आपला ठसा उमटविला आहे. सतत समर्पित वृत्तीने काम करीत असलेला आपला कर्मचारी वर्ग अभिनंदनास पात्र आहे. कंपनीच्या सर्व प्रयासाय नेहमीच सर्व बचत गटांनी व संयुक्त जबाबदारी गटांनी भरघोस प्रतिसाद दिला आहे .

कंपनीच्या प्रगतीमध्ये कंपनीचे भागधारक हे महत्वाचे भागीदार आहेत त्यांचा आम्हांस मिळणारा पाठींबा व कंपनीवर त्यांनी दाखविलेला विश्वास याकरता कंपनी त्यांची आभारी आहे. कंपनीचे भागधारक, बचत गट सदस्य , हितचिंतक , बचत गट सदस्य,यांचेकडुन सततच्या सहकार्य व पाठींब्याबददल संचालक मंडळ आभारी आहे. तसेच रत्नाकर बँक, एस बी आय, बेसिक्स / आय जी एस लॅम्प फंड व NSFDC (National Scheduled Castes Finance and Development Corporation) जयम सोल्युसन्स, इतर रेग्युलेटरी ॲथोरीटी, इतर आर्थिक संस्था, बँका यांच्याकडुन मिळालेला अमूल्य सल्ला व आर्थिक सहाय्य या सर्वांबददल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे.

**स्थळ – लातूर**

**दिनांक २९ सप्टेंबर २०२३**

**श्री.रमेश भिसे**
चेअरमन

ANIK

# यशोगाथा

# शिलाई कामामुळे दुग्ध व्यवसाय सुरू केला



माझं नाव भारती मंडलिक मी आहे कडकनाथ वाडी गावची राहणारी माझं दहावीपर्यंत शिक्षण झालं आहे आमची आठ एकर शेती आहे आम्ही नवरा बायको शेती करत आहे आमची पूर्वीची परिस्थिती बिकटच होती कारण पावसावर शेती अवलंबून असल्यामुळे कधी पिकं यायची तर कधी यायची नाही त्यामुळे आम्हाला आणि अडचणी येत होत्या अशावेळी गावातील सावकाराकडूनच कर्ज घेत होतो त्याचा व्याजाचा दर जास्त असायचा पण आमची अडचण सुटत होती .

दोन अडीच वर्षांपूर्वी पर्याय संस्थेच्या बांगर ताई आमच्या गावात येत होत्या गावातील महिलांना भेटत होत्या बोलत होत्या त्या संस्थेची बचत गटाची कर्ज प्रकरणाची माहिती देत होत्या त्यावेळी आम्ही महिला बचत गट सुरू केला होता आमच्या गटात पाच महिला होत्या आम्ही शंभर रुपयाची बचत करत होतो पूर्वी मी वहिनीच्या शिलाई मशीन्स घरी आणल्या होत्या ब्लाउज शिवायचं काम करत होते ताईंच्याकडनं सगळी माहिती मिळाल्यामुळे आम्ही कर्ज घेण्याचा विचार केला.

मी पहिलं कर्ज रुपये तीस हजार घेतलं होतं त्या पैशातून मी ब्लाऊज शिवण्याची मशीन रुपये ९५०० आणि फॉल पिको मशीन रुपये १२००० ची विकत घेतली होती त्यानंतर मी वहिनीच्या मशीन्स तिला परत केल्या होत्या , माझा ब्लाऊज शिवण्याचा आणि साडीला फॉल पिको करण्याचा व्यवसाय चांगला सुरू झाला म्हणजे रोजचं उत्पन्न रुपये ३०० ४०० होत होतं त्यावेळी मी महिन्याला रुपये बारा हजार कमवत होते.

माझं जसं उत्पन्न वाढत गेलं तशा आम्ही सुधारणा पण करत गेलो आमच्या शेतात बोर घेतली पाईपलाईन केली त्यामुळे शेतीचे उत्पन्न सुरू झालं या वाढलेल्या उत्पन्नातून दोन गाई घेतल्या त्यासाठी ८० हजार रुपये खर्च केला होता गाईचं रोजचं दूध १२ लिटर सुरू झालं ते डेअरीला जातं त्याचा भाव रुपये ३६ मिळत होता रोजचे रुपये ३५० ते ४०० वेळेस होते साधारणता महिना रुपये दहा ते बारा हजार दुधापासून उत्पन्न सुरू झालं होतं

माझ्या शिवणाच्या कामाचे रुपये १२००० आणि दुधाचे रुपये १२००० साधारणता महिन्याला रुपये २५ हजाराचे उत्पन्न मिळत होतं आमचा घर खर्च शेती खर्च हप्ता असा खर्च होऊन रुपये ५००० राहत होते मला गावातील महिलांना सांगायचं आहे पर्यायी संस्थेच्या मदतीमुळे आमची परिस्थिती सुधारली आहे स्वतःची परिस्थिती सुधारण्यासाठी स्वतः पुढे यायला पाहिजे अनिकच्या कर्जाची परतफेड वेळेवर केली तर महिलांचा विकास होतोच

# शेळी पालन व्यवसायातून परिस्थिती सुधारली

माझं नाव प्रियांका लगाडे मी आहे इंदापूर गावची राहणारी माझं शिक्षण नववीपर्यंत झालं आहे माझं मालक जेसीपी ऑपरेटर चे काम करतात आम्ही पूर्वी पुण्याला राहत होतो तिथे मालक जेसीपी ऑपरेटेडचं काम करत होते पण Covid काळ सुरू झाला आणि आम्हाला परत आमच्या गावात यावं लागलं होतं तो काळ आणि अडचणीचा होता तेव्हा आम्ही गावातल्या सावकाराकडून कर्ज घेतलं होतं त्याचा व्याजाचा दर जास्त होता ते कर्ज फेडायला बरेच दिवस गेले होते

आमच्या गावात एक दोन वर्षांपूर्वी पर्याय संस्थेच्या शिंदे मॅडम येत होत्या त्या गावातल्या महिलांना एकत्र करून मीटिंग घेत होत्या आम्हाला या संस्थेची माहिती बचत गटाची माहिती कर्ज प्रकरणाची माहिती समजावून सांगत होत्या आम्ही महिलांनी एकत्र येऊन बचत गट सुरू केला होता महिना रुपये शंभर ची बचत करीत होतो आम्ही एक दोन वर्ष बचत गट चालवला गटातल्या गटातच देवाण-घेवाण करत होतो .

शिंदे मॅडम आम्हा महिलांना थोड्या पैशातून ही कसा व्यवसाय करता येतो हे समजावून सांगत होत्या मी पहिले कर्ज रुपये तीस हजार घेतले होते त्या पैशातून सहा शेळया विकत घेतल्या होत्या मी त्या शेळयांचं चारा पाणी सगळं काम करत होते एका शेळीला सहा महिन्यांनी एक दोन पिल्ले होतात त्याचा संभाळ करत ती मोठी झाली की तिची विक्री करत असते एक वर्षाचं करडू रुपये आठ नऊ हजाराला विकले जात तसेच मोठी शेळी सुद्धा रुपये दहा हजाराला विकली जाते

आमच्या या शेळीपालनाच्या व्यवसायात वर्षभरात खरेदी विक्री असा व्यवहार होत असतो वर्षाला उलाढा रुपये एक लाखाच्या आसपास होत असते घर खर्च पालनाचा खर्च कर्जाचे हप्ते हा सगळा खर्च धरून सुद्धा निम्म प्रॉफिट मिळत असतं गेल्या दोन वर्षात माझ्या शेळीपालन व्यवसायात शेळया वाढवल्या आहेत सध्या माझ्याकडे २० शेळया आहेत आमचं तसं शेळीपालनातून उत्पन्न वाढलं तसं आम्ही सुधारणा पण केल्या आहे

आम्ही घराचं रिपेरिंग करून घेतलं आहे माझ्या दोन मुलांच्या शिक्षणाचा खर्च होत आहे आम्ही भाचीच लग्न करून दिलं आहे तिच्या बाळंतपणाचाही खर्च आम्हीच केला आहे , मी आता दुसरं टॉप अप्स रुपये ४० हजाराचं कर्ज घेतलं आहे त्यात पदरच रुपये २०००० घालून एक म्हैस रुपये ६० हजाराची घेतली आहे ती म्हैस सध्या गाभण आहे इथून पुढे तिचं दुधाचं उत्पन्न सुरू होणार आहे

**पर्याय संस्थेच्या मदतीमुळे मला शेळीपालनाचा व्यवसाय जमला आहे महिलांनी कर्जाचा वापर व्यवसायासाठी व्यवस्थित केला तर आपली परिस्थिती सुधारू शकते**

# कष्ट केलं तर कोट्याधीश व्हाल

माझं नाव पंखाबाई मनोहर महानोर.. मी आहे सावरगावची राहणारी.माझ शिक्षण ६ पर्यंत झालं आहे.आमची ६ एकर शेती आहे.मी,मालक, मुलगा.. आम्ही तिघेही शेती च करत आहे. आमची पूर्वीची परिस्थिती हलाखीची होती.आमच्या भागात पावसाचे प्रमाण कमी असल्याने पिकांचं उत्पन्न कमी च आहे.आता संसार म्हटलं की खर्च आला च की..मग तो शेतीचा,घराचा, लग्नाचा, सणांचं..या साठी पैसा लागतोच,मग काय सावकाराकडून कर्ज काढायचे आणि खर्च करायचं.

सावकाराचा व्याजाचा दर जास्त आहे, हे कळत होतं की,पण आमची गरज भागत होती.आम्हाला सावकाराशिवाय ' पर्याय ' नव्हताच. आम्हाला २०१७-१८ साली सिंधूताई, उषाताई यांच्या मुळे ' पर्याय ' स्वयंसेवी सामाजिक संस्थेची माहिती मिळाली होती. या ताई नियमितपणे गावात येत होत्या. गावातील महिलांना भेटत होत्या.त्या संस्था, महिला बचत गट, कर्ज योजना याची माहिती सांगत होत्या. आमची परिस्थिती लक्षात घेऊन, कर्ज योजना, व्याज दर, परतफेड या विषयावर समजावून सांगत होत्या.आम्ही विचार केला आणि कर्ज प्रकरण केलं बरं का...

आम्ही २०१८ साली पहिलं कर्ज रुपये २५,०००/- घेतलं, त्यात पदरचे पैसे घालून एक जर्सी गाय घेतली. त्या वेळी ती गाय रोज २० लिटर दूध देत होती, ते दूध रोज डेअरीला पाठवत होतो,त्याचे चांगले पैसे मिळत होते. आमचं उत्पन्न वाढले होते. गाईचा चारापाणी खर्च, घराचा खर्च, कर्जाचा हप्ता.. हे सगळं जाऊन नफा होत होतो.आम्ही पहिलं कर्ज वेळेतच फेडले होते. त्यामुळे आम्ही २०२० साली.. दुसरं कर्ज रुपये ५०,०००/- घेतलं होतं, त्यात पदरचे पैसे घालून एक जर्सी गाय घेतली होती.ती गाय रोज २५ लिटर दूध देत होती, त्या वेळी दूधाला चांगला भाव मिळाला होता.

आता दोन गाईंच मिळून रोज च ४५-५० लिटर दूध डेअरी ला घालत होतो.आता तर आमचं उत्पन्न अधिक वाढलं होतं, त्यामुळे आम्ही दुसरं कर्ज ही वेळेतच फेडले होते.आम्ही २०२३ साली तिसरं कर्ज रुपये ७५,०००/- घेतलं, त्यात पदरचे पैसे घालून एक जर्सी गाय घेतली होती, आता आमच्या कडे गाईंची संख्या वाढली, तसं रोज च दूध ही वाढलं...१०० लिटर च्या आसपास झालं की, आम्ही विचार केला आणि दूधाचा खवा तयार करण्याचा व्यवसाय सुरू केला होता, रोज चा रोज खवा तयार होत होता, त्याला भावही चांगला मिळत होता.

आमचा शेतीचा, घराचा, चारापाणी खर्च, हप्ता हे सगळं जाऊन आम्हाला महिन्याला रुपये ४५-५० हजार रहात होते. आमचं जसं उत्पन्न वाढत गेलं तसं व्यवसाय ही वाढविले, आता आमच्या कडे १० गाई,१ म्हैस आहे. आम्ही शेती साठी मळणी यंत्र, नांगर, मोगड, ट्रॅक्टर विकत घेतली आहे.हे सगळं शेतकऱ्यांना भाडया ने देत आहे, त्याचं ही उत्पन्न सुरू झालं आहे. आम्ही सगळं कुटुंब सकाळी ७ ला कामाला सुरुवात करतो, ते रात्री ७ पर्यंत काम करत आहोत. आज च्या घडीला शेती, दूध, ट्रॅक्टर एवढं व्यवसाय करत आहे, या सगळयाचा विचार केला तर आम्ही ' कोट्याधीश ' झाल्या च वाटत आहे... पण या साठी आम्ही सगळे जण कष्ट.. कष्ट.. कष्ट.. करत आहोत. **आम्हाला वेळोवेळी ' पर्याय '..' अनिक फायनांस ' ची मदत झाली आहे, हे सांगताना आनंद होत आहे मला बायांना सांगायचे आहे, ' आपलं मन चांगलं ठेवा, कष्ट करा, वेळेवर कर्जाचं हप्ते फेडा,आपली पत वाढवा.. या साठी ' पर्याय ' चा हात आपल्या बरोबर आहे, हे लोकांना सांगत रहा.**

# शिवणाच्या दोन मशीन्स घेतल्या



माझं नाव कौशल्या लोंढे मी आहे अंदुरा गावची राहणारी दहा-बारा वर्षांपूर्वी आमची परिस्थिती बिकट होती माझा मोठा मुलगा कंपनीत कामाला होता त्याच्या एकट्याच्या पगारात आमचं चाललेलं होतं तवा आम्ही पत्र्याच्या खोल्यांमध्ये राहत होतो, आमच्या गावात राणीताई येत होत्या राणीताई म्हणजे स्वाती कवडे त्यांचं नाव आहे आम्ही सगळे त्यांना लाडाने राणीताई म्हणतोय हाक मारतोय, राणी ताईंनी पर्याय संस्थेची माहिती अण्णा तोडकर यांची माहिती सांगितली होती ताई गावात महिलांच्या मिटींग घेत होत्या महिलांना बचतीचे महत्व बचत गटाचे महत्व कर्जाची माहिती कसं घ्यायचं कसं फेडायचं सांगत होत्या , ताईंच्या मार्गदर्शनाप्रमाणे आम्ही दहा महिलांचा बचत गट सुरू केला होता सुरुवातीला रुपये दहा ने बचत सुरू केली ती रुपये १०० पर्यंत वाढविली होती आमची वर्षभराच्या बचतीचं गणित चांगलं जमलं होतं तेव्हा मी पहिलं कर्ज रुपये २५००० घेतलं होतं त्या रकमेतून मी बांगड्यांचा व्यवसाय सुरू केला होता त्यावेळी मी कळम वरून बांगड्यांचा माल आणायचा आणि घरातच बांगड्या भरण्याचा व्यवसाय सुरू केला होता गावातल्या बायका बांगड्या भरायला घरीच येत होत्या सणावाराला म्हणजे संक्रांतीला पंचमीला बाया बांगड्या भरायला यायच्या तेव्हा जागा पुरायची नाही एका दिवसाला रुपये पाचशेचा धंदा बाईचा आमच्या खेड्यात बांगड्या म्हणजे सौभाग्याचं लेणं समजलं जातं जर हातात बांगडी नसली तर गावात नाव ठेवतात ते अपमानाचं जगणं होतंय तुमच्या शहरात हातात काय बी नसलं तरी चालतंय पण खेड्यात बायकांच्या हातात बांगड्या असतातच मला

पहिलं कर्ज फेडायला एक दीड वर्ष लागलं होतं मला आठवतंय अडचणी आल्या होत्या पोरगा दारू प्यायला लागला होता आमचं मालक पण दारू प्यायला लागले होतो घरामंदी परिस्थिती बिकट झाली होती, माझ्या बांगड्याच्या व्यवसायात मला सुनबाई ची मदत होत होती त्यावेळी सुनबाई फॉल पिको चे काम करायची ब्लाउजची कापड आणून विकायची , आम्ही दोघी तक धरून व्यवसाय करत होतो तेव्हा पहिलं कर्ज फेडलं होतं आणि मग दुसरं कर्ज घेतलं रुपये पन्नास हजाराचा आम्ही चार शेळ्या घेतल्या होत्या दोन-चार वर्ष सांभाळल्या त्याची कर्ड विकली शिळयाही विकल्या त्याचं रुपये ७० हजार आले होते त्या पैशात एक जर्सी गाय विकत घेतली गाईच्या दुधाचे उत्पन्न सुरू झालं होतं गाय रोज सकाळ संध्याकाळ पाच पाच लिटर दूध देत होती ,

**आमचं जसं उत्पन्न वाढत गेलं तशा सुधारणा केल्या पाच वर्षांपूर्वी नवीन घर बांधलं त्याला रुपये सात आठ लाख खर्च केला होता सुनबाईला शिवणाच्या दोन मशीन्स घेतल्या त्यामुळे सुनबाईंचा शिवणकामाचा चांगला व्यवसाय सुरू झाला होता , आम्ही मैत्रिणीला मदत केली होती तिच्या अडचणीच्या काळात तिची शेती विकत घेतली होती शेतीचे उत्पन्न सुरू झालं**




**महिलेचे नाव - निर्गुणा महादेव टाकणखार**
**पत्ता - रा. माजलगाव ता. माजलगाव जी.बीड**

निर्गुणा महादेव टाकणखार या माजलगाव येथील सर्वसाधारण कुटुंबातील महिला असून या अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड अंतर्गत गेली १३ वर्षापासून तथागत महिला बचत गटा मध्ये अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कुटुंबात एकूण ९ सदस्य आहेत

**गटामध्ये प्रवेश -** निर्गुणा महादेव टाकणखार या माजलगाव येथील सर्वसाधारण कुटुंबातील महिला असून त्यांनी गेली १३ वर्षा मध्ये अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कडून गटाच्या माध्यमातून ५ वेळेस कर्ज घेतलेले आहे व त्या कर्जाचा उपयोग त्यांनी घरगुती छोटे मोठे व्यवसाय सुरु करण्यासाठी केला आहे जसे की ज्वेलरी साडी सेंटर घरातील इतर सदस्यही कमावते असल्यामुळे व सर्वांचीच कष्ट करण्याची मानसिकता असल्यामुळे त्यांनी छोटे छोटे व्यवसाय करत आज त्यांनी अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कडून त्यांनी दिनांक :- ०८/०८/२०२२ रोजी रक्कम रु ६०,०००/- व स्वतः जमवलेले काही बचत च्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या मुलांना DJ घेऊन दिलेला आहे त्यांची दोन्ही मुले आज हा व्यवसाय अत्यंत छान पद्धतीने करत आहेत निर्गुणा महादेव टाकणखार यांनी घेतलेल्या कर्जाची परत फेड वेळोवेळी व्यवस्थित केलेली आहे.

**सध्याची स्थिती -**

या DJ च्या व्यवसायातून त्यांना दरवर्षी १५०,०००/- ते २००,०००/- रु उत्पन्न मिळते व निर्गुणा महादेव टाकणखार या घरी राहून ज्वेलरी व साडी सेंटर चा व्यवसाय अत्यंत छान पद्धतीने करत आहेत.

**महिलेचे कंपनी विषयी मनोगत :-**

गरजेच्या वेळी अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कडून मिळालेले कर्ज याचा माझ्या कुटुंबाचे आर्थीक उत्पन्न वाढविण्यासाठी खूप मदत झालेली आहे त्या मुळे मी माझ्या कुटुंबाच्या वतीने अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मनापासून धन्यवाद मानते.

**माहीती संकलन**
**आशा कापसे**
**फिल्ड मॅनेजर**
**अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड**
**ब्रँच - केज जी. बीड**



**महिलेचे नाव - जमुनाबाई सुंदरराव वाघमारे**
**पत्ता - रा. सावरगाव ता. माजलगाव जी. बीड**

जमुनाबाई सुंदरराव वाघमारे या सावरगाव येथील सर्वसाधारण शेतकरी कुटुंबातील महिला असून या अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड अंतर्गत गेली ११ वर्षापासून मातोश्री रमाई महिला बचत गटा मध्ये सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कुटुंबात एकूण १२ सदस्य आहेत

**गटामध्ये प्रवेश -**

जमुनाबाई सुंदरराव वाघमारे या सावरगाव येथील सर्वसाधारण शेतकरी कुटुंबातील महिला असून त्यांनी गेली ११ वर्षा मध्ये अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कडून गटाच्या माध्यमातून ३ वेळेस कर्ज घेतलेले आहे व त्या कर्जाचा उपयोग त्यांनी शेती व शेतीशी निगडीत व्यवसाय सुरु करण्यासाठी केला आहे जसे की आधुनिक शेती साठी लागणारे उपकरणे, शेतामध्ये सिंचनाची व्यवस्था घरातील इतर सदस्यही शेतामध्ये कष्ट करतात व त्यांचा जास्तीत जास्त भर हा आधुनिक व सेंद्रिय शेती करण्यावर जास्त भर आहे आज त्यांनी अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कडून त्यांनी दिनांक :- ०९/१०/२०२२ रोजी रक्कम रु ५०,०००/- व स्वतः जमवलेले काही बचत च्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या घरामध्ये एक नवीन व्यवसाय सुरू केला आहे तो म्हणजे गौरी गणपतीच्या मूर्ती बनवणे व स्वतः बाजारात बसून विकणे जमुना सुंदरराव वाघमारे यांनी घेतलेल्या कर्जाची परत फेड वेळोवेळी व्यवस्थित केलेली आहे.

**सध्याची स्थिती -**

या गौरी गणपती मूर्ती बनवणे व विकणे च्या व्यवसायातून त्यांना दरवर्षी २००,०००/- ते २५०,०००/- रु उत्पन्न मिळते व जमुना सुंदरराव वाघमारे या घरी राहून गौरी, गणपतीच्या मूर्ती बनवणे व शेतातील कामाचा व्यवसाय अत्यंत छान पद्धतीने करत आहेत.

**महिलेचे कंपनी विषयी मनोगत :-**

गरजेच्या वेळी अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कडून मिळालेले कर्ज याचा माझ्या कुटुंबाचे आर्थीक उत्पन्न वाढविण्यासाठी खूप मदत झालेली आहे त्या मुळे मी माझ्या कुटुंबाच्या वतीने अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मनापासून धन्यवाद मानते.

**माहीती संकलन**
**आशा कापसे**
फिल्ड मॅनेजर
अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड
ब्रँच - केज जी. बीड

**नावः- अलका हरिभाऊ घोडके.**
**बचत गटाचे नावः- माऊली महिला बचत गट.**
**पत्ता :- गाव मोरवड तालुका रेनापुर जिल्हा लातूर.**



माझे नाव  अलका हरिभाऊ घोडके असून मी मोरवड येथील रहिवासी आहे आम्ही गावातील दहा महिलांनी मिळून २०१४ साली माऊली महिला बचत गटाची स्थापना केली या गटाचे खाते भोकरंबा येथील भारतीय स्टेट बँक येथे काढले यासाठी आम्हाला मीरा कसमळे मॅडमनी माहिती दिली. आम्ही महिलांनी बँकेत सहा महिने व्यवहार केल्यानंतर आम्हाला आनिक फायनान्स कंपनीकडून प्रत्येकी चाळीस हजार रुपये कर्ज देण्यात आले. मी स्वतः माझ्या नावावर चाळीस हजार रुपये कर्ज घेऊन त्यात स्वतःची रक्कम घालून सत्तर हजार रुपयांमध्ये एक म्हैस खरेदी केली व शेतीला जोड व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय चालू केला. तसेच गावामध्ये दूध डेअरी चालू झाली व दुधाला चांगला भाव मिळाल्याने कर्जाची हप्ते व्याजासह परतफेड केली आणि त्यानंतर आनिक फायनान्स कडे कर्ज मागणी केली व दुसरे लोन रुपये साठ हजार घेतले व त्यातून परत एक म्हेस स्वतःचे पैसे घालून खरेदी केली.

शहरामध्ये लस्सी ची मागणी पाहता मी माझ्या घरी लस्सी बनवण्याचा व्यवसाय चालू केला व त्यासाठी इतर बाहेरचे दूध घेऊन लस्सी तयार करायला सुरुवात केली. व्यवसाय सुरुवात करताना माझ्या पतीच्या सहाय्याने व इतर गावकऱ्यांच्या सहाय्याने मी मार्केटची माहिती घेतली आणि त्यानंतर पॉकेट सील करण्याची मशीन सुद्धा घेतले व बाहेरगाव ची ऑर्डर घेण्यात सुरुवात केली.

सध्या परिस्थितीमध्ये माझ्या गावातील किराणा दुकानात मी लसीचा मालं पुरवत आहे रेनापुर सारख्या तालुक्याच्या ठिकाणी हॉटेल किराणा यांनाही मी सध्या माल पुरवत आहे. उन्हाळयाच्या सिझनमध्ये लस्सीला खूप मागणी येते आणि याची मागणी फेब्रुवारीपासून जुलै पर्यंत राहते आणि त्यानंतर मी दुग्ध व्यवसाय करते. या व्यवसायातून मला चांगलाच फायदा झाला आहे आणि माझी आर्थिक परिस्थिती सुद्धा सुधारली आहे यामधून माझी प्रेरणा घेऊन खूप महिला या व्यवसाय करण्यासाठी इच्छुक आहेत आणि मला त्यांच्यासोबत मिळून हा व्यवसाय खूप मोठा करायचा आहे. मला कर्जामार्फत अनिक फायनान्स ने मदत केल्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार.

# शेळी पालन व्यवसायातून परिस्थिती सुधारली

माझं नाव प्रियांका लगाडे मी आहे इंदापूर गावची राहणारी माझं शिक्षण नववीपर्यंत झालं आहे माझं मालक जेसीपी ऑपरेटर चे काम करतात आम्ही पूर्वी पुण्याला राहत होतो तिथे मालक जेसीपी ऑपरेटेडचं काम करत होते पण केंदर्ह काळ सुरू झाला आणि आम्हाला परत आमच्या गावात यावं लागलं होतं तू काळ आणि अडचणीचा होता तेव्हा आम्ही गावातल्या सावकाराकडून कर्ज घेतलं होतं त्याचा व्याजाचा दर जास्त होता ते कर्ज फेडायला बरेच दिवस गेले होते आमच्या गावात एक दोन वर्षांपूर्वी पर्याय संस्थेच्या शिंदे मॅडम येत होत्या त्या गावातल्या महिलांना एकत्र करून मीटिंग घेत होत्या आम्हाला या संस्थेची माहिती बचत गटाची माहिती कर्ज प्रकरणाची माहिती समजावून सांगत होत्या आम्ही महिलांनी एकत्र येऊन बचत गट सुरू केला होता महिना रुपये शंभर ची बचत करीत होतो आम्ही एक दोन वर्ष बचत गट चालवला गटातल्या गटातच देवाण-घेवाण करत होतो शिंदे मॅडम आम्हा महिलांना थोड्या पैशातून ही कसा व्यवसाय करता येतो हे समजावून सांगत होत्या मी पहिले कर्ज रुपये तीस हजार घेतले होते त्या पैशातून सहा शेळया विकत घेतल्या होत्या मी त्या शेळयांचं चारा पाणी सगळं काम करत होते एका शेळीला सहा महिन्यांनी एक दोन पिल्ले होतात त्याचा संभाळ करत ती मोठी झाली की तिची विक्री करत असते एक वर्षाचं करडू रुपये आठ नऊ हजाराला विकले जात तसेच मोठी शेळी सुद्धा रुपये दहा हजाराला विकली जाते.

आमच्या या शेळीपालनाच्या व्यवसायात वर्षभरात खरेदी विक्री असा व्यवहार होत असतो वर्षाला उलाढा रुपये एक लाखाच्या आसपास होत असते घर खर्च पालनाचा खर्च कर्जाचे हप्ते हा सगळा खर्च धरून सुद्धा निम्म प्रॉफिट मिळत असतं गेल्या दोन वर्षात माझ्या शेळीपालन व्यवसायात शेळया वाढवल्या आहेत सध्या माझ्याकडे २० शेळया आहेत आमचं तसं शेळीपालनातून उत्पन्न वाढलं तसं आम्ही सुधारणा पण केल्या आहे आम्ही घराचं रिपेरिंग करून घेतलं आहे माझ्या दोन मुलांच्या शिक्षणाचा खर्च होत आहे आम्ही भाचीच लग्न करून दिलं आहे तिच्या बाळंतपणाचाही खर्च आम्हीच केला आहे मी आता दुसरं टॉप अप्स रुपये ४० हजाराचं कर्ज घेतलं आहे त्यात पदरच रुपये २०००० घालून एक म्हैस रुपये ६० हजाराची घेतली आहे ती म्हैस सध्या गाभण आहे इथून पुढे तिचं दुधाचं उत्पन्न सुरू होणार आहे पर्याय संस्थेच्या मदतीमुळे मला शेळीपालनाचा व्यवसाय जमला आहे महिलांनी कर्जाचा वापर व्यवसायासाठी व्यवस्थित केला तर आपली परिस्थिती सुधारू शकते

# एका व्यवसायातून अनेक व्यवसाय उभे केले

माझं नाव रंजना जाधव मी आहे बोरगाव धनेश्वरीची राहणारी माझं शिक्षण दहावीपर्यंत झालं आहे आमची दहा एकर शेती आहे माझी दोन्ही मुलं शेती करत आहे पूर्वी आमची परिस्थिती बिकटच होती पावसावर शेती अवलंबून असल्यामुळे उत्पन्न तेवढं नव्हतं आम्हाला काय आणि गावात काय आणि अडचणीला सावकाराचं कर्ज हा आधार असायचा त्याचा व्याजाचा दर जास्त होता पण लोक विचार करायचे अडचण तर भागविली जाते असंच लय दिवस चालू होतं पंधरा वर्षांपूर्वी पर्याय संस्थेच्या कांबळे काही गावात येत होत्या ताई गावातील महिलांना एकत्र करून मीटिंग घेत होत्या मीटिंगमध्ये संस्थेची माहिती बचत गटाची माहिती कर्ज प्रकरणाची माहिती समजावून सांगत होत्या त्यावेळी आम्ही महिलांनी एक बचत गट सुरू केला होता त्या गटात रुपये दहाची बचत सुरू केली ती रुपये १०० पर्यंत नेली होती मी पहिलं कर्ज रुपये १४००० घेतलं होतं त्या पैशातून मी पिठाची चक्की घेतली होती मी दळण दळायचं काम करत होती वृक्ष उत्पन्न रुपये ४०० ५०० होत होतं आठवड्याला रुपये ३००० च्या आसपास मिळत होते साधारणता महिन्याला रुपये दहा ते बारा हजार रुपये मिळत होते घर खर्च हप्ता इतर खर्च जाऊन निम्म प्रॉफिट होत होतं मी पहिलं कर्ज दोन वर्षात वेळेवर फेडलो होतो मी दुसरं कर्ज रुपये ४०,००० घेतलं होतं त्या कर्जातून एक जर्सी गाय विकत घेतली होती तिचं दूध सकाळ संध्याकाळ मिळून रोजचं आठ लिटर होत होतं त्याचा आम्ही खवा करत होतो त्यावेळी खव्याला भाव रुपये १०० मिळत होता महिन्याला खव्याचे उत्पन्न तीन चार हजारापर्यंत होत होतं मी दुसरं कर्जही वेळेवर दोन वर्षातच फेडलं होतं मी तिसरं कर्ज रुपये ६००० घेतलं होतं त्यात पदरच पैसे टाकून आम्ही कुक्कुटपालनाचा व्यवसाय सुरू केला आहे हा व्यवसाय माझा मुलगा पाहतो त्यावेळी आम्ही ३००० पक्षी विकत घेतले होते त्यांच्यासाठी चांगली शेड बांधली होती साधारणता दीड महिन्याच्या कालावधीनुसार पिल्लांची विक्री होत असते त्यात आम्हाला रुपये चाळीस हजार मिळत होते कुक्कुटपालनाच्या व्यवसायात रुपये पाच हजाराचा खर्च जाऊन आम्हाला तीस-पस्तीस हजार रुपयांचे प्रॉफिट होतं आम्ही एका व्यवसायातून दुसरा त्यातून तिसरा असं व्यवसाय वाढवत नेलं या कामात माझ्या मुलांनी मला मदत केली जसं व्यवसायांमुळे उत्पन्न वाढलं तशा आम्ही सुधारणा पण केल्या आहेत आम्ही मोठे घर म्हणजे बंगला बांधला त्याला रुपये तीस लाख खर्च आला होता माझ्या मुलांनी सोलर प्लांट बसविले आहे त्याला रुपये बारा लाख खर्च केला आहे आम्ही स्वतःची लाईट घेतली आहे त्याला रुपये दोन लाख खर्च केला आहे आम्ही शेतीसाठी आणि वाहतुकीसाठी रुपये सात लाखाचा ट्रॅक्टर विकत घेतला आहे मुलाने ट्रॅक्टरच्या व्यवसायातून ही उत्पन्न सुरू केलं आहे माझा थोरला मुलगा महेश याचं बीएससी कॉम्प्युटरचं शिक्षण झालं आहे त्याने नोकरी करण्यापेक्षा स्वतःच्या शेतीत लक्ष घातलं आहे तू शेती आणि कुक्कुटपालन हा व्यवसाय सांभाळत आहे त्यावेळी मला पर्यायी संस्थेने मदत केल्यामुळे एक व्यवसाय सुरू केला होता आताच्या घडीला चार व्यवसाय चालू आहे मला महिलांना सांगायचं आहे पर्यायी संस्थेच्या मदतीमुळे हे काय चार व्यवसाय करत आहे पण त्यासाठी तुम्ही वेळेवर हप्ते भरले पाहिजे वेळेवर कर्जफेड केली पाहिजे असं धोरण अमलात आणलं तरच महिलांची परिस्थिती सुधारते

# माझं भांडवल तयार झालं

माझं नाव सुषमा शिनगारे मी आहे पारा गावाची राहणारी माझं शिक्षण सातवीपर्यंत झालं आहे आमची तीन एकर शेती आहे शेतामध्ये सोयाबीन उडीद मुग पिक घेतो माझा नवरा शेतीमध्येच काम करत आहे माझ्या तीनही मुलांची शिक्षणा चालू आहे पूर्वी आम्ही शेतात जाऊन शेतमजुरीचे काम करत होतो त्यावेळी आम्हाला दिवसाला रुपये १०० मजुरी मिळत होती आम्ही अडीअडचणीला गावातील सावकाराकडून जास्त व्याजदराने पैसे घेत होतो अशी कर्ज घेणं आणि फेडण यामध्ये चार-पाच वर्षे गेली आहे २००९ सङङ पर्याय संस्थेच्या नंदाताई आमच्या गावात येत होत्या महिलांना एकत्र करून मीटिंग घेत होत्या ताई मीटिंगमध्ये संस्थेची बचतीची कर्ज प्रकरणाची माहिती समजावून सांगत होत्या त्यावेळी आम्ही दहा महिलांनी एकत्र येऊन एक महिला बचत गट सुरू केला होता आम्ही शंभर रुपये प्रमाणे बचत करत होतो मी पहिलं कर्ज रुपये तीस हजार घेतलं होतं त्या पैशातून पिठाची चक्की घेतली आणि व्यवसाय सुरू केला त्याचं रोजचं उत्पन्न रुपये २०० ३०० येत होतं महिन्याला रुपये ६००० येत होते घर खर्च इतर खर्च हप्ता जाऊन रुपये ३००० च प्रॉफिट होत होतं मी पहिलं कर्ज वेळेत फेडलं आणि दुसरं कर्ज रुपये ५० हजार घेतलं होतं त्या रकमेतून मी किराणा दुकान सुरू केलं होतं आता दहा वर्षे झाली आहे किराणा व्यवसाय चांगलाच चाललेला आहे साधारणता महिन्याला ३० ४० हजाराची उलाढाल होते या उत्पन्नातून मी दुसरं कर्जही वेळेवर फेडलं आहे आणि आता तिसरा कर्ज रुपये ५० हजाराचं घेतलं आहे त्या पैशातून मी मिरची कांडप मशीन विकत घेतलं आणि मसाला तयार करण्याचा व्यवसाय सुरू केला आहे त्याचही महिना रुपये दहा-पंधरा हजाराचे उत्पन्न सुरू झालं आहे माझं उत्पन्न जसं वाढत गेलं तशा आम्ही सुधारणा पण केल्या आहे आम्ही तीन लाखांचं घर बांधलं आहे नवऱ्याला टू व्हीलर गाडी घेऊन दिली आहे माझ्या तीनही मुलांच्या शिक्षणाचा खर्च वाढलेला आहे मी रोजची पिग्मी योजनेत महिना रुपये ३००० ची बचत करत आहे पर्यायच्या मदतीमुळे माझे एका पटोपाठ एक असे तीन व्यवसाय सुरू झाले आत्ताच्या घडीला माझ्या तीन व्यवसायांच्या भांडवलाचा विचार केला तर मी पाच लाख रुपयांची भांडवलाची मालकीण आहे मला महिलांना सांगायचं आहे महिलांनी स्वतःसाठी काम करावं परी आहे सारखी संस्था मदतीला आहे संस्थेचे सर्व लोक वेळोवेळी महिलांना मार्गदर्शन करत असतात हे लक्षात घ्यावं विचार करावा स्वतःचा विकास स्वतःच करावा पर्याय आहेच

# आनंदाचे क्षण.. पर्याय मुळे!

माझं नाव मीनाबाई सुनिल झिरपे.मी आहे कार्ला गावची राहणारी.माझं शिक्षण ५ वी पर्यंत झालं आहे.आमचा मुलगा सौरभ १४ वीला बार्शी ला आणि मुलगी साक्षी १० वी ला अनाळया ला शिकत आहे.आमची ४ एकर शेती आहे.आम्ही दोघं नवरा बायको शेती करत आहे.कांदा, ज्वारी, तूर पिक घेत असतो. आम्हाला ' पर्याय ' ची माहिती होण्यापूर्वी अडी अडचणी येत होत्या.कधी घरासाठी, शेतीसाठी, शिक्षणासाठी पैसे लागत होते.त्या वेळी सावकाराकडून पैशाची गरज भागत होती.आमचं कर्ज फेडण्यासाठी दुप्पट, तिप्पट रक्कम जात होती पण आमची अडचण सुटत होती. आमच्या गावात दहा वर्षापूर्वी उषाताई येत होत्या.गावातील महिलांना भेटत होत्या.महिलांची मिंटीग घेत होत्या.ताई संस्थेची, महिला बचत गटाची, कर्ज प्रकरणाची माहिती सांगत होत्या.शेतीच्या बरोबर जोडीला दुसरा व्यवसाय सुरू करता येईल याचं ही मार्गदर्शन करत असत. आम्ही नवरा बायको ने विचार केला होता, त्यावेळी आम्ही पहिलं कर्ज रुपये २५ हजार घेतलं होतं, त्यात अजून भर घालून एक जर्सी गाय विकत घेतली होती.तिचं रोजचं दूध १५ लिटर येत होतं,ते दूध डेअरी ला घालत होतो.चारापाणी खर्च, इतर खर्च जाऊन महिन्याला रुपये ७-८ हजार रहात होते.त्यामुळे आम्ही पहिलं कर्ज वेळेतच फेडले होते. आम्ही दुसरं कर्ज रुपये ६० हजार घेतलं होतं, त्या रकमेत अजून भर घालून आमची एक एकर शेती सोडविली होती.आमच्या मालकीची शेती झाली होती.आम्ही शेती त पिक घ्यायला सुरुवात केली होती.त्याचं उत्पन्न सुरू झालं होतं.जो नफा मिळत होता, त्याच्या तून कर्जाचं हप्ते वेळेवर भरत होतो.त्यामुळे आम्ही दुसरं कर्ज वेळेवर फेडले होते. आम्ही तिसरं कर्ज रुपये ६० हजार घेतलं होतं, त्या रकमेत अजून भर घालून, आम्ही शेती मध्ये बोअर घेतलं होतं, त्याला पाणी लागलं होतं, आम्ही शेती मध्ये कांदा पिक घ्यायला सुरुवात केली होती.कांदाचं उत्पन्न चांगलं येत होतं.त्यामुळे आम्ही तिसरं कर्ज ही वेळेतच फेडले होते. आम्ही चौथं कर्ज रुपये ७५ हजार घेतलं होतं, त्या रकमेत अजून भर घालून,गाईसाठी मोठी शेड बांधली आहे.आताच्या घडीला आमच्याकडे ५-६ जर्सी गाई आहेत, त्याचं रोज च दूध डेअरी ला घालत आहे.दूधाचं उत्पन्न वाढले आहे. आमची सुधारणा झाली आहे, आर्थिक स्थिती चांगली झाली आहे.आम्ही शेती साठी, जनावरे विकत घेण्यासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी, दुचाकी वाहनासाठी पैसा खर्च केला आहे. आम्ही कर्जाचा हप्ता चुकविला नाही, तारखेला हप्ता भरतोच आणि गावातील महिलांच्या गटाला ही हप्ता वेळेवर भरायची सवय लावलेली आहे. आमचा तीन - चार वर्षांचा शेतीचा प्रवास चालू आहे, यात ' पर्याय ' ' अनिक फायनांस ' वेळोवेळी मदत झाली आहे, आजच्या घडीला मालकीण बाई म्हणून एक कोटी ची झाली आहे. मला बायांना सांगायचे आहे की, ज्याच्या साठी कर्ज काढलं.. त्याच्या साठी च वापरा, वेळेवर हप्ते भरा, तुमच्या परिस्थिती सुधारणारच. आमची एक एकर शेती सोडविली होती,तो दिवस आमच्या साठी आनंदाचा होता..हा क्षण ' पर्याय ' मुळे बघायला मिळाला आहे, असं वाटतं.

# Independent Auditor's Report

**Yadkikar & Chandak**
Chartered Accountants
ICAI Firm Registration No. 129599W

Independent Auditor's Report

**TO THE MEMBERS OF ANIK FINANCIAL SERVICES PRIVATE LIMITED**
**REPORT ON THE STANDALONE FINANCIAL STATEMENTS**

We have audited the accompanying standalone financial statements of **ANIK FINANCIAL SERVICES PRIVATE LIMITED**, which comprise the Balance Sheet as of **March 31, 2023**, the Statement of Profit and Loss and the Cash Flow Statement for the year then ended, and a summary of the significant accounting policies and other explanatory information.

In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid standalone financial statements give the information required by the Act in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India, of the state of affairs of the Company as at **March 31, 2023**, and profit/loss and its cash flows for the year ended on that date.

## Basis for Opinion

We conducted our audit in accordance with the Standards on Auditing (SAs) specified under section 143(10) of the Companies Act, 2013. Our responsibilities under those Standards are further described in the Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements section of our report. We are independent of the Company in accordance with the Code of Ethics issued by the Institute of Chartered Accountants of India together with the ethical requirements that are relevant to our audit of the financial statements under the provisions of the Companies Act, 2013 and the Rules there under, and we have fulfilled our other ethical responsibilities in accordance with these requirements and the Code of Ethics. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

## Responsibility of Management for the Standalone Financial Statements

The Company's Board of Directors is responsible for the matters stated in section 134(5) of the Companies Act, 2013 ("the Act") with respect to the preparation of these standalone financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance, and cash flows of the Company in accordance with the accounting principles generally accepted in India, including the accounting Standards specified under section 133 of the Act. This responsibility also includes maintenance of adequate accounting records in accordance with the provisions of the Act for safeguarding of the assets of the Company and for preventing and detecting frauds and other irregularities; selection and application of appropriate implementation and maintenance of accounting policies; making judgments and estimates that are reasonable and prudent; and design, implementation and maintenance of adequate internal financial controls, that were operating effectively for ensuring the accuracy and completeness of the accounting records, relevant to the preparation and presentation of the financial statement that give a true and fair view and are free from material misstatement, whether due to fraud or error.

**Yadkikar & Chandak**
Chartered Accountants
ICAI Firm Registration No. 129599W

## Auditors' Responsibility

Our responsibility is to express an opinion on these standalone financial statements based on our audit. We have considered the provisions of the Act, the accounting and auditing standards and matters which are required to be included in the audit report under the provisions of the Act and the Rules made there under.

We conducted our audit in accordance with the Standards on Auditing specified under Section 143(10) of the Act. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatement.

An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and the disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal financial control relevant to the Company's preparation of the financial statements that give a true and fair view to design audit procedures that are appropriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of the accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by the Company's Directors, as well as evaluating the overall presentation of the standalone financial statements.

We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion on the financial statements.

## Opinion

In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements give the information required by the Act in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India, of the state of affairs of the Company as at **March 31, 2023**, and its profit/loss and its cash flows for the year ended on that date.

## Report on Other Legal and Regulatory Requirements

1. As required by Section 143(3) of the Act, we report that:
    - a. We have sought and obtained all the information and explanations which to the best of our knowledge and belief were necessary for the purposes of our audit.
    - b. In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Company so far as it appears from our examination of those books.
    - c. The Balance Sheet, the Statement of Profit and Loss, and the Cash Flow Statement dealt with in this Report agree with the books of account.
    - d. In our opinion, the aforesaid financial statements comply with the Accounting Standards specified under Section 133 of the Act, read with Rule 7 of the Companies (Accounts) Rules, 2014.
    - e. On the basis of the written representations received from the directors as on **March 31, 2023,** taken on record by the Board of Directors, none of the directors is disqualified as on **March 31, 2023,** from being appointed as a director in terms of Section 164 (2) of the Act.

a. With respect to the adequacy of the internal financial controls over financial reporting of the Company and the operating effectiveness of such controls, refer to our separate report in "Annexure A"; and

b. With respect to the other matters to be included in the Auditor's Report in accordance with Rule 11 of the Companies (Audit and Auditors) Rules, 2014, in our opinion and to the best of our information and according to the explanations given to us:

i. The Company does not have any pending litigations which would impact its financial position.
ii. The Company did not have any long-term contracts including derivative contracts for which there were any material foreseeable losses.
iii. There were no amounts which were required to be transferred to the Investor Education and Protection Fund by the Company.

2. As required by the Companies (Auditor's Report) Order, 2016 ("the Order") issued by the Central Government in terms of Section 143(11) of the Act, we give in "Annexure B" a statement on the matters specified in paragraphs 3 and 4 of the Order.

**For Yadkikar & Chandak**
**Chartered Accountants**
**ICAI Firm Registration No. 129599W**

**Partner: CA R.B. Chandak**
**Membership No. 107304**

Place: Aurangabad
Date: June 6th, 2023

**Yadkikar & Chandak**
Chartered Accountants
ICAI Firm Registration No. 129599W

**ANNEXURE TO THE AUDITORS' REPORT REFERRED TO IN OUR REPORT**
**[Pursuant to Non-Banking Finance Companies Auditor's Report (Reserve Bank) Directions, 2016]**

Further to our audit report of even date issued under Sec 143 (11) of the Companies Act, 2013, as required by the Non-Banking Financial Companies Auditor's Report (Reserve Bank) Directions, 2016 (Vide **Notification No. DNBS.PPD.03/66.15.001/2016-17 dated September 29, 2016)** based on the information and explanations given to us and based on the records produced, we state below a statement of matters specified in paragraph 3 of the said Directions.

1. In the case of all non-banking financial companies (paragraph 3(c) of the order):

i The Company has obtained a certificate of registration as a Non-Banking Financial Company vide Certificate No. 13.00702 dated 20th April 1998 pursuant to Sec 45-I (a) of the Reserve Bank of India Act, 1934 (2 of 1934). The company received NBFC-MFI status from RBI vide letter no. DNBS. MRO. CMD. No. 3813/12.01.048/2014-15 dated February 4th, 2015.

ii The company is continuously undertaking the business of non-Banking financial institution during the financial year 2022-23, and the company is entitled to continue to hold such Certificate of Registration issued by Reserve Bank of India, in terms of its asset/income pattern as on March 31, 2023.

iii Assets / Income pattern of the company based on audited financial statement as on March 31, 2023, is as follows.

| Sr. | Particulars | Amt (Rs.) |
|---|---|---|
| 1 | Total Assets of the Company | 37,45,80,460 |
| 2 | Loan Portfolio of the Company | 31,78,60,029 |
| 3 | Other Assets exclusively used for finance activities | 5,67,20,431 |
| 4 | Other Assets exclusively used for business other than microfinance activities | Nil |
| 5 | Ratio of Assets attributable to finance activities of the company to Total assets. | 84.86% |
| 4 | Total Income of the Company | 6,27,89,815 |
| 5 | Income from finance Activities | 6,00,60,380 |
| 6 | Income from temporary investment of Idle funds | Nil |
| 7 | Income from activities other than finance activities | 27,29,435 |
| 8 | Ratio of Income from finance Activities to Total Income (excluding income from temporary investment of idle funds) | 96.00% |

The company's predominant assets are only Loans (particularly for end-purpose use as loans) and income of the company is derived from these loans only and hence making the company eligible to be classified as a Loan Company.

1. In the case of Non-Banking Financial Companies Not Accepting Public Deposits (paragraph 3(c) of the order)

   i. The Board of Directors has passed a resolution in the meeting held on 25th November 2022 for the non-acceptance of public deposits during financial year 2022-23 and onwards.

   ii. The Company has not accepted any public deposit during the year under review.

   iii. The company has complied with the prudential norms relating to income recognition, accounting standards, asset classification and provisioning for bad and doubtful debts as applicable to it in terms of Non-Banking Financial Company – Non-Systemically Important Non-Deposit taking Company (Reserve Bank) Directions, 2016 and Non-Banking Financial Company - Systemically Important Non-Deposit taking Company and Deposit taking Company (Reserve Bank) Directions, 2016, during the financial year ended on March 31, 2023.

   iv. The requirement of Para (iv) of paragraph 3 (C) of the order is not applicable on Company, because Company is not a Systemically Important Non-Deposit taking NBFC's as defined in paragraph 2(1)(xix) of the Non-Banking Financial Company - Systemically Important Non-Deposit taking Company and Deposit taking Company (Reserve Bank) Directions, 2016.

   v. The nonbanking financial company has been correctly classified as NBFC Micro Finance Institutions (MFI) as defined in the Non-Banking Financial Company – Non-Systemically Important Non-Deposit taking Company (Reserve Bank) Directions, 2016 and Non-Banking Financial Company - Systemically Important Non-Deposit taking Company and Deposit taking Company (Reserve Bank) Directions, 2016

   vi. The capital adequacy ratio 20.76% as disclosed in the return (NBS-7) submitted to the RBI has been correctly arrived at and such ratio is following the minimum CRAR prescribed by the Bank.

   vii. The company has furnished to the RBI the annual statement of capital funds, risk assets/exposures and risk asset ratio (NBS-7) within the stipulated period.

**For Yadkikar & Chandak**
**Chartered Accountants**
**ICAI Firm Registration No. 129599W**

Place: Aurangabad
Date: June 6th, 2023

**Partner: CA R.B. Chandak**
**Membership No. 107304**

# BALANCE SHEET AS AT 31st MARCH, 2023

| Particulars | As at 31-3-23 | As at 31-3-22 |
|---|---|---|
| **EQUITY AND LIABILITIES** | | |
| **(1) Shareholders' Fund** | | |
| (a) Share Capital | 9,79,66,320 | 9,79,66,320 |
| (b) Reserve and Surplus | 2,34,93,196 | 2,22,21,249 |
| (c) Money received against Share Warrant | - | - |
| **(2) NCD Application Money pending allotment** | 13,06,937 | 1,06,47,936 |
| **(3) Non-Current Liabilities** | | |
| (a) Long-term Borrowings | 22,61,46,651 | 12,61,99,649 |
| (b) Deferred Tax Liabilities (Net) | 1,58,299 | 1,38,668 |
| (c) Other Long Term Liabilities | - | - |
| (d) Long Term Provisions | - | - |
| **(4) Current Liabilities** | | |
| (a) Short-term Borrowings | - | - |
| (b) Trade Payables | - | - |
| (c) Other Current Liabilities | 2,16,68,557 | 1,42,50,758 |
| (d) Short-Term Provisions | 38,40,500 | 26,89,471 |
| | | |
| | 37,45,80,460 | 27,41,14,051 |
| **ASSETS** | | |
| **(1) Non-Current Assets** | | |
| (a) Fixed Assets | | |
| (i) Tangible assets | 23,49,142 | 12,24,237 |
| (ii) Intangible assets | - | - |
| (iii) Capital work-in-progress | - | - |
| (iv) Intangible Assets under development | - | - |
| (b) Non-Current Investments | - | - |
| (c) Deferred Tax Assets (net) | - | - |
| (d) Long Term Loans and Advances | - | - |
| (e) Other Non-Current Assets | - | - |
| **(2) Current Assets** | | |
| (a) Current Investments | 2,60,76,894 | 2,48,93,278 |
| (b) Inventories | - | - |
| (c) Trade Receivables | 32,40,44,555 | 23,73,68,173 |
| (d) Cash and Cash Equivalents | 1,28,67,029 | 86,35,382 |
| (e) Short-Term Loans and Advances | 92,42,840 | 19,92,981 |
| (f) Other Current Assets | - | - |
| | 37,45,80,460 | 27,41,14,051 |

**In terms of our report attached**
For Yadkikar & Chandak
Chartered Accountants
ICAI Firm Regn No: 129599W

**Partner: CA R.B.Chandak**
Membership No.: 107304

**For & On Behalf of Board Of Directors**
M/s Anik Financial Services Private Limited

## STATEMENT OF PROFIT & LOSS FOR THE YEAR ENDED 31st MARCH, 2023

| Particulars | As at 31-3-23 | As at 31-3-22 |
|---|---|---|
| | | |
| **INCOME** | | |
| Revenue from Operations | 6,00,60,380 | 4,57,89,713 |
| Other Income | 27,29,435 | 35,10,815 |
| **Total Revenue** | **6,27,89,815** | **4,93,00,528** |
| | | |
| **EXPENDITURE** | | |
| Employee Benefit Expenses | 1,36,86,398 | 1,04,74,440 |
| Financial Costs | 2,90,93,967 | 2,11,06,374 |
| Depreciation and Amortization Expenses | 6,02,725 | 3,24,360 |
| Other Expenses | 1,76,23,147 | 1,57,88,880 |
| **Total Expenses** | **6,10,06,237** | **4,76,94,054** |
| | | |
| Profit before Exceptional and Extraordinary items an | 17,83,578 | 16,06,474 |
| Exceptional Items | - | - |
| Profit before Etraordinary Items and Tax | 17,83,578 | 16,06,474 |
| Extraordinary Items | - | - |
| Profit before Tax | 17,83,578 | 16,06,474 |
| Tax expenses: | | |
| (1) Current tax | 4,92,000 | 4,13,175 |
| (2) Deferred tax | 19,631 | 5,896 |
| Profit (Loss) from the perid from continuing operatio | 12,71,947 | 11,87,403 |
| Profit/(Loss) for the period | 12,71,947 | 11,87,403 |
| | | |
| Transfer to Statutory Reserve Fund | 2,54,310 | 2,37,481 |
| | 10,17,637 | 9,49,922 |
| (Loss)/Profit brought forward from previous year | 46,19,013 | 36,69,091 |
| **Surplus carried to Balance Sheet** | **56,36,650** | **46,19,013** |

**In terms of our report attached**
For Yadkikar & Chandak
Chartered Accountants
ICAI Firm Regn No: 129599W

**Partner: CA R.B.Chandak**
Membership No.: 107304

**For & On Behalf of Board Of Directors**
M/s Anik Financial Services Private Limited

Place: Aurangabad
Date: June 6th, 2022
UDIN:-21107304AAAACI3476

## अनिकच्या विविध शाखा मध्ये घेण्यात आलेले गुंतवणूकदार स्नेहमिलन कार्यक्रम








## धाराशिव जिल्हा व बीड जिल्हा अंतर्गत घेण्यात आलेले विविध महिला सन्मान भेटवस्तू वितरण सोहळयांची क्षणचित्रे









## धाराशिव जिल्हा व बीड जिल्हा अंतर्गत घेण्यात आलेले विविध महिला सन्मान भेटवस्तू वितरण सोहळयांची क्षणचित्रे






## महिलांना सुरू केले विविध उदयोग व्यवसाय









अनिक कडुन मिळलेल्या अर्थसहाय्यातुन अनेक महिलांना अनेक छोटे-मोठे उदयोग व्यवसाय सुरू केले असुन. वेळेवरती परतफेड करून पुन्हा नव्याने कर्ज घेवुन त्या आपला व्यवसाय देखील वाढवत आहे.

ANIK

**मुख्य कार्यालय**

पहिला मजला, प्लॉट नंबर सी–१/२,
निलेश्वर कॉ.ऑप. हावुसिंग सोसायटी, फेम तपाडिया
सिनेमागृहाच्या पाठीमागे, प्रोझोन मॉल रोड, एन–१,सिडको,
छत्रपती संभाजीनगर.-४३१००३.
मो ७८७५५५५५९९, **Email - ceo@anikfin.com**

**नोंदणीकृत कार्यालय**

सहयाद्री बिल्डींग, अमितेश हॉटेल मागे, सावरकरनगर, साई नाका, आंबाजोगाई रोड,
लातुर ४१३ ५१२ , **फोन** ०२३८२–२२७७८२



ANIK FINANCIAL SERVICES PVT LTD